MHCH040000552021

**सत्र खटला क्र.१०/२०२१ मधील**
**निशाणी ८१ वरील आदेश**

१. अर्जदार राजु उर्फ राजकुमार सुंदरलाल केवट रा.माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर याने माजरी पोलीस स्टेशन येथील अपराध क्र.२१९/२०२० मध्ये बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.३४.एटी.९१६८ व मारोती कंपनीची स्विफ्ट डिझायर कार नोंदणी क्र.एम.एच.३२.सी.९७९७ ही वाहने जप्त केलेली आहे. सदरचा दोन्ही वाहने ही अर्जदाराच्या मालकीची आहेत. त्यापैकी मोटारसायकलचा इंजिन क्र.JEZWEG41077 व चेसीस क्र. MD2A64CZ0EWG32860 तसेच, कारचा इंजिन क्र.D13A1363597 व चेसीस क्र. 3FKEB2S00238703BA असे आहेत. त्याकरीता त्याने निशाणी ८२ च्या यादीप्रमाणे दोन्ही वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र, दोन्ही वाहनांच्या विमा प्रमाणपत्रांच्या प्रती व अर्जदाराचे आधार कार्ड दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात सरकारी अभियोक्ता यांचा अभिप्राय मागविण्यात आला. त्यानुसार सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा अभिप्राय निशाणी ८५ नुसार दाखल केला. त्यानुसार जप्त मोटारसायकल व जप्त कार सुप्रतनाम्यावर देण्यास आल्यास त्या वाहनांचा वापर त्याच प्रकारचा गुन्हा करण्याकरीता होवु शकतो, त्या वाहनांच्या रंग आणि बनावटीमध्ये फेरफार होवु शकतो तसेच, अर्जदार हा तपासकामी वाहने सादर करावयाची झाल्यास टाळाटाळ करण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर अर्जावर त्यांनी हरकत घेतली. तपासादरम्यान जप्त केलेली मालमत्ता ही अर्जदाराच्या दैनंदिन वापराची आहे. त्यामुळे त्याला अडचण निर्माण झालेली आहे. ती परत मिळण्याकरीता सदरचा अर्ज केलेला आहे.

२. दोन्ही वकीलांनी केलेला युक्तीवाद ऐकला. अर्जदार हा व्यवसाय करतो आणि त्याच्या दैनंदिन वापराकरीता सदर वाहनांची त्यास आवश्यकता आहे. सदर

वाहने त्याच्या मालकीची आहेत. त्याकरीता त्याने आवश्यक ते कागदपत्र दाखल केले आहेत. पोलीसांचा तपास पुर्ण होवुन दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्याउपरही, न्यायालयातर्फे अर्ज मंजुर करतांना लावण्यात येणा-या अटी व शर्तींचे पालन करण्यास त्याने तयारी दर्शविली आहे. त्यामुळे, अर्जदार हा स्वतः जप्त वाहनांचा मालक असल्याचे अभिलेखावर दिसुन येते. तसेच, जप्त मालमत्ता पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास तिचे तांत्रीक नुकसान होवु शकते. अशा परिरिस्थीतीत अर्जदाराला ते मुद्देमाल परत करणे न्यायोचित ठरते. त्यामुळे, अर्जदाराला जप्त मुद्देमाल देतांना सुंदरभाई विरुध्द गुजरात सरकार एआयआर २००३ सुप्रीम कोर्ट ६३८ या न्यायनिवाडयात दिलेल्या मार्गदर्शन तत्वाप्रमाणे परत देणे न्यायोचित ठरते करीता मी खालीलप्रमाणे अंतीम आदेश करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपराध क्र. २१९/२०२० मध्ये जप्त केलेला मुद्देमाल बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.३४.एटी.९१६८ व मारोती कंपनीची स्विफ्ट डिझायर कार नोंदणी क्र.एम.एच.३२.सी.९७९७ ही दोन्ही वाहने अर्जदार राजु उर्फ राजकुमार सुंदरलाल केवट, रा. माजरी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यास रु.१,००,०००/- अक्षरी रूपये एक लक्ष व रु.८,००,०००/- अक्षरी रु. आठ लक्ष रुपयांचे अनुक्रमे नुकसान भरपाईचे पत्र (Indemnity Bond) आधारे परत देण्यात यावी.

३. तपास अधिका-याने सदर मुद्देमालाचे अर्जदाराच्या खर्चाने प्रत्येकी चार छायाचित्र काढून घ्यावेत व त्याबाबतचे पंचनामे तयार करण्यात यावे व ते पंचनामे व छायाचित्र दोषारोपपत्रासोबत जोडावेत.

४. अर्जदारास असे निर्देशीत करण्यात येते की, सदरची मालमत्तेच्या स्वरुपात बदल करु नये अथवा विक्री अथवा कोणासही हस्तांतरीत करु नये. तसेच तपासणी अधिकारी अथवा न्यायालय आदेश करतील तेव्हा ती मालमत्ता हजर करावी.

दिनांकः १९/०८/२०२२. ( र.ना.बावनकर )

अति.सत्र न्यायाधिश, वरोरा.

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Divakar P.Temkar |
| Name of Court | Addl. Sessions Judge, Warora |
| Date of Dictation | 19-08-2022 |
| Order signed by the P.O. on | 19-08-2022 |
| Order uploaded on | 19-08-2022 |